# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## शहर अभियंता विभाग

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

## जाहीर आवाहन

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका हद्दीत वास्तव्य करणाऱ्या सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, मान्सुनचे आगमन झाले असुन या कालावधीत कमी / अधिक प्रमाणात पाऊस झाल्यास काही विविक्षित ठिकाणी पाण्याचा निचरा लवकर न झाल्यास पाणी साचुन (Water logging) राहते. परिणामी, नागरीकांची / वाहनधारकांची मर्यादीत कालावधीसाठी होणारी गैरसोय टाळणेसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याचे महानगरपालिकेने निश्चित केले आहे.

यासाठीची परिपुर्ण व समग्र माहिती घेणेस्तव अशा पाणी साचणाऱ्या (Water logging) स्थळांची एकत्रित यादी तयार करणेस्तव नागरीकांकडुन प्रतिसाद स्वरुपाने माहिती (Feedback) मागविण्यात येत आहेत जेणेकरून परिपुर्ण माहिती मनपाच्या अभिलेखी उपलब्ध होईल. त्यास्तव नागरीकांच्या सुलभतेसाठी गुगल फॉर्म तयार करण्यात आला असुन, सोबत दिलेला QR Code स्कॅन केल्यानंतर मोबाईलवर अथवा स्वत:च्या संगणकावर सदरचा गुगल फॉर्म उपलब्ध होऊ शकेल. तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळावरूनही डाऊनलोड करून त्यात माहिती भरता येईल. यासाठी गुगल फॉर्मची प्रिंट सादर करण्याची आवश्यकता नाही. अथवा स्विकारली जाणार नाही.

तरी नागरीकांनी महानगरपालिकेस या व्यापक जनहिताच्या कामात आपला सहभाग नोंदवून सहकार्य करावे ही विनंती.

Water Logged Complaint, CSMC

स्थळ : छत्रपती संभाजीनगर
दिनांक : 24 / 06 /2024

**आयुक्त**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका